**<u>प्रेसनोट</u>** **दि. 12/11/2025**

**ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे परिक्षेत्राकडून लोहारा पोलीस स्टेशन, जि. धाराशीव येथील प्रभारी अधिकारी व तीन पोलीस कर्मचारी यांचेवर लाच मागणी व लाच स्विकारले प्रकरणी कारवाई केलेबाबत.**

| **लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक** | **पुणे परिक्षेत्र** |
|---|---|
| **पोलीस स्टेशन व गुन्हा नोंद क्रमांक** | लोहारा पोलीस स्टेशन, जि. धाराशीव |
| **कलम** | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम, सन 1988 चे कलम 7, 7 अ, 12 अन्वये. |
| **तक्रारदार** | पुरुष, वय 32 वर्ष, धंदा-शेती |
| **आरोपी लोकसेवकाचे नाव व कार्यालय** | 1) ज्ञानेश्वर भीमराज कुकलारे वय-43 वर्ष, पद-सहा.पोलीस निरीक्षक, पोलीस ठाणे प्रभारी अधिकारी, लोहारा पोलीस ठाणे, जि.धाराशिव.<br>2) आकाश मधुकर भोसले, वय-32 वर्ष, पोलीस शिपाई 135/ लोहारा पोलीस ठाणे, जि.धाराशिव.<br>3) अर्जुन शिवाजी तिघाडे, वय-34 वर्ष, पोलीस नाईक 1595/लोहारा पोलीस ठाणे, जि.धाराशिव.<br>4)निवृत्ति बळीराम बोळके, वय-57 वर्ष, सहा.पोलीस उप निरीक्षक, लोहारा पोलीस ठाणे, जि.धाराशिव. |
| **मागणी केलेली लाचेची रक्कम** | रू. 5,00,000/- (पाच लाख रूपये) |
| **पडताळणी दरम्यान लाच मागणी रक्कम** | मागितलेल्या रू. 5,00,000/- लाच रक्कमेपैकी तक्रारदाराच्या भावाकडून रू. 3,00,000/- स्विकारल्याचे मान्य करून उर्वरीत रू. 2,00,000/- (दोन लाख रूपये) लाच मागणी केली. |
| **स्वीकारलेली लाच रक्कम** | **रू. 2,00,000/-(दोन लाख रूपये)** |
| **पडताळणी दिनांक** | दि. 6/11/2025, 07/11/2025, 10/11/2025 |
| **सापळा दिनांक** | दि. 11/11/2025 रोजी 18.56 वाजता. |
| **ठिकाण** | तक्रारदार यांचे शेतामधे, भातागली, ता.लोहारा, जि.धाराशिव येथे |
| **सापळा अधिकारी यांचे नाव व पद** | 1)श्री.प्रशांत चौगुले,पोलीस उप अधीक्षक,ला.प्र.वि.सोलापूर (मो.क्र. 9823225465)<br>2) श्री प्रवीण निंबाळकर, पोलीस निरीक्षक, ला प्र वि,पुणे. (मो.क्र. 9552574140) |
| **तपास अधिकारी यांचे नाव व पद** | श्री. बाळासाहेब नरवटे, पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि. धाराशीव, (मो.क्र. 9552733040) |

**थोडक्यात माहिती :-** यातील तक्रारदाराच्या मित्राविरूद्ध लोहारा पोलीस स्टेशन जि.धाराशिव येथे दाखल असलेल्या गुन्ह्यामध्ये तक्रारदारास सह आरोपी न करणेसाठी यातील वरील लोकसेवक यांनी 5 लाख रुपयाची लाच मागणी केली होती. त्यावेळी तक्रारदाराकडे 5 लाख रूपये नसल्याने तक्रारदाराने स्वतःकडील 10 तोळे वजनाचे सोन्याचे कडे काढून दिले होते ते त्यांनी ठेउन घेऊन तक्रारदाराला 5 लाख रुपये घेऊन येण्यासाठी पोलीस ठाण्यातून पाठवून दिले. तक्रारदार 5 लाख रुपयांची जुळवणी करत असताना आरोपी लोकसेवकानी तक्रारदाराच्या भावाकडे जाऊन त्याच्याकडून परस्पर 4 लाख रुपये घेतले परंतु त्यानंतरही आरोपी लोकसेवक तक्रारदाराकडे आणखी 5 लाख रुपयाची लाच मागत असल्याची तक्रार केली होती.

सदर तक्रारीच्या अनुषंगाने दि. 6/11/2025, 07/11/2025, 10/11/2025 रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे परिक्षेत्र मार्फत केलेल्या पडताळणीमध्ये आरोपी क्र. 2 भोसले पोलीस व आरोपी क्र. 4 बोळके पोलीस यांनी तक्रारदाराकडे यापुर्वी मागितलेले पैसे आनून देई पर्यंत तक्रारदाराचे 10 तोळ्याचे सोन्याचे कडे स्वतःकडे ठेवून घेतल्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. तसेच लोहारा पोलीस ठाणे प्रभारी स.पो.नि. ज्ञानेश्वर कुकलारे यांनी तक्रारदाराकडे पाच लाखाची प्राथमिक मागणी केल्यानंतर पडताळणी कारवाईमध्ये तक्रारदारांच्या भावाकडून 3 लाख रुपये स्वीकारल्याचे मान्य करून तक्रारदाराकडून आणखी 2 लाख रुपयाची लाच मागणी करून सदर लाच रक्कम आरोपी क्र. 2 पोलीस भोसले किंवा आरोपी क्र. 3 पोलीस तिगाडे यांचेकडे देण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाले.

वरील प्रमाणे लाच मागणी पडताळणी केल्यानंतर दि.11/11/2025 रोजी करण्यात आलेल्या सापळा कारवाई दरम्यान यातील आरोपी क्र. 3 लोकसेवक अर्जुन शिवाजी तिघाडे पोलीस नाईक 1595/लोहारा पोलीस ठाणे यांनी तक्रारदार यांचे शेतामधे, भातागली, ता.लोहारा, जि.धाराशिव येथे तक्रारदाराकडून 2,00,000/- रुपयाची लाच स्वीकारली असता 18:56 वाजता रंगेहात पकडण्यात आले आहे.

वरील आरोपी लोकसेवक क्रमांक 1 ते 4 यांना ताब्यात घेऊन त्यांच्याविरूद्ध लोहारा पोलीस ठाणे जि. धाराशिव येथे भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम 1988 कलम 7, 7 अ, 12 नुसार गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**सदरची कारवाई पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री.शिरीष सरदेशपांडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, पुणे व अपर पोलीस अधीक्षक श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि. पुणे, अपर पोलीस अधीक्षक श्री. अर्जुन भोसले, ला.प्र.वि. पुणे,**

यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली. लोकसेवक शासकीय अधिकारी / कर्मचारी किंवा त्यांच्यावतीने खाजगी इसम (एजंट) हे कोणतेही शासकीय काम करून देण्यासाठी कायदेशीर फी व्यतिरिक्त अन्य लाचेची मागणी करीत असल्यास त्याबाबत तात्काळ लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील क्रमांकवर सपंर्क साधण्याचे आवाहन श्री. शिरीष सरदेशपांडे, पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि. पुणे (मो.क्र. 9823167154) तसेच अपर पोलीस अधीक्षक-1 श्री. अजीत पाटील, ला.प्र.वि.,पुणे (मो.क्र. 9029030530) यांनी केले आहे.

1) ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे- दुरध्वनी क्रमांक -020-26122134, 26132802, 26050423, 9403781064
2) व्हॉट्स-ॲप क्रमांक - 9403781064 (पुणे), 9930997700 (मुंबई)
3) ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
4) वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
5) ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

दयानंद गावडे
सहा.पोलीस आयुक्त / पो. उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे.